सन २०१६-१७ च्या हंगामातील तूरीच्या खरेदीसाठी महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ मर्या.मुंबई यांना रु.१३५ कोटीच्या कर्जास दिलेल्या शासन हमीस मुदतवाढ देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन निर्णय क्रमांक :- शाहमी-२०१७/सपववि/प्र.क्र.४२/अर्थबळ,
मंत्रालय, मुंबई-३२
दिनांक :- ०२ फेब्रुवारी, २०१८

संदर्भ : १) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.शाहमी -१०९९/प्रक्र.६८/शा.हमी, दि. ५.११.१९९९.
२) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.शाहमी -१००८/प्रक्र.१८/शा.हमी,दि.२८.४.२००८
३) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.शाहमी २०१७/सपववि/प्र.क्र.४२/अर्थबळ, दि.२८.४.२०१७
४) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.शाहमी २०१७/सपववि/प्र.क्र.४२/अर्थबळ, दि.१२.६.२०१७
५) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.शाहमी २०१७/सपववि/प्र.क्र.४२/अर्थबळ, दि.१९.६.२०१७

प्रस्तावना:-

हंगाम २०१६-१७ मध्ये राज्यातील तूर उत्पादक शेतक-यांना योग्य भाव मिळावा यासाठी केंद्र शासनाने जाहीर केलेल्या किंमान आधारभूत किंमतीवर बाजार हस्तक्षेप योजनेंतर्गत तूरीची खरेदी करण्याचा निर्णय सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या दिनांक २७.४.२०१७ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे. या प्रयोजनासाठी महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ मर्या. मुंबई यांची नोडल एजन्सी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे. या नोडल एजन्सी मार्फत खरेदी केलेल्या तूरीची रक्कम शेतकऱ्यांना अदा करण्यासाठी राष्ट्रीयीकृत बँकेकडून उभारावयाच्या रु.१३५ कोटी इतके कर्ज सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या मान्यतेने उभारण्यासाठी उपरोक्त संदर्भाधिन अ.क्र.४ येथील दि.१२.६.२०१७ च्या शासन निर्णयान्वये शासन हमी मंजूर करण्यात आली होती. सदर शासन हमीची मुदत शासन निर्णयाच्या दिनांकापासून ६ महिन्यांच्या कालावधीपर्यंत वैध होती. सदर मुदत दिनांक १२.१२.२०१७ रोजी संपली आहे. तथापि, त्याआधारे घेतलेल्या कर्जाची अद्याप पूर्णपणे परतफेड झाली नसल्याने महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ मर्यादित, मुंबई यांनी सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभागामार्फत सादर केलेल्या प्रस्तावानुसार शासन हमीस मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

प्रस्तुत प्रकरणी महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ मर्यादित, मुंबई यांनी सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभागामार्फत सादर केलेल्या प्रस्तावानुसार शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक : शाहमी-२०१७/ सपववि /प्र.क्र.४२/ अर्थबळ, दि. १२.६.२०१७ अन्वये मंजूर करण्यात आलेल्या रु.१३५ कोटीच्या कर्जास दिलेल्या शासन हमीची मुदत दिनांक ३१.३.२०१८ पर्यंत वाढविण्यात येत आहे. शासन निर्णय दिनांक २८.४.२०१७ व दिनांक १२.६.२०१७ मधील इतर अटी व शर्ती कायम राहतील.

२. हा शासन निर्णय सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या नस्ती क्र.सपस-२०१७/प्र.क्र.७७ भाग-१/२४ स वरील प्रस्ताव व वित्त विभागाचा शासन हमी क्र. १/२०१७-१८ नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय शासनाचा www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०२०२१४१७५८७६०५ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Walter Cajetan Dmello

Digitally signed by Walter Cajetan Dmello
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Finance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=15523aa80438dadfcf951b188414eb757c358470bc55b163469bb9cb85bbe50f, serialNumber=20c05674761ef3e1c5207a659b4f2d7699be3df29369f399531d1fa92b517391, cn=Walter Cajetan Dmello
Date: 2018.02.02 15:10:09 +05'30'

(वॉल्टर डिमेलो)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) राज्यपालांचे सचिव.
२) मुख्यमंत्र्याचे प्रधान सचिव,मंत्रालय, मुंबई.
३) मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधान सभा/विधान परिषद, विधानभवन,मुंबई
४) प्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई.
५) प्रबंधक, लोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६) प्रबंधक, उप लोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७) सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक,
८) महालेखापाल, महाराष्ट्र १ / २ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर.
९) महालेखापाल, महाराष्ट्र १ / २ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर.
१०) ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानभवन सचिवालय,मुंबई (५ प्रती)
११) सर्व विधानमंडळ सदस्य, विधानमंडळ,मुंबई.
१२) बहुजन समाज पार्टी, डी-१, इन्सा इटमेंट, आझाद मैदान, मुंबई
१३) भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश,सी.डी.ओ.बॅरेक्स क्र १, योगक्षेमसमोर, वसंतराव भागवत चौक, नरीमन पॉईंट, मुंबई- ४०००२०,
१४) भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी ३१४, राजभवन, एस.व्ही.पटेल रोड, मुंबई- ४०० ००४.
१५) भारतीय कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी) महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोव मिल पॅलेस, वरळी, मुंबई-१३,
१६) इंडियन नॅशनल काँग्रेस पार्टी, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई- ४०००२५.
१७) नॅशनॅलिस्ट काँग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरीमन पॉईंट, मुंबई- २१,
१८) शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई-४०००२८,
१९) अ.मु.स. (पणन), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
२०) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ मर्यादित कनमूर हाऊस, नरसी नाथा स्ट्रीट, पो.बॉ. नं. ५०८०, मस्जीद बंदर, मुंबई ४००००९
२१) वित्त विभाग (साउ /व्यय-२ /ऋण व हमी नियंत्रण कक्ष), मंत्रालय, मुंबई.
२२) कार्यासन अधिकारी-२४ स, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई--४०० ०३२.
२३) इंडियन बँक, मांडवी शाखा, पहिला मजला, कनमूर हाऊस,२८१/२८७, नरसी नाथा स्ट्रीट, मुंबई ४००००९.
२४) निवड नस्ती -अर्थबळ.